**केंद्र शासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत राज्याच्या नागरी भागातील आर्थिक दुर्बल घटकांकरीता वैयक्तिक शौचालय बांधकाम कार्यक्रमाखाली प्रकल्प प्रस्ताव सादर करताना अनुसरावयाची मार्गदर्शक तत्वे**

**महाराष्ट्र शासन**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

**शासन परिपत्रक क्र.कखयो२००९/प्र.क्र. ८६ /वै.शौ./पापु२१**

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,

**दिनांक - ६ मे , २००९**

वाचावे :- (१) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. .कखयो२००८/प्र.क्र. १००/वै.शौ./पापु२१ दि.१०.९.२००८
(२) शासन परिपत्रक पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. .कखयो२००८/प्र.क्र. १३३/वै.शौ./पापु२१ दि.२३.१०.२००८

राज्याच्या नागरी भागातील (महानगरपालिका व नगरपरिषद क्षेत्र) आर्थिक दुर्बल घटकातील कुटुबांकरिता वैयक्तिक शौचालयांची उपलब्धता व्हावी यासाठी राज्यातील सर्व शहरांमध्ये केंद्र शासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत सुधारित मार्गदर्शक तत्वांनुसार वैयक्तिक शौचालय बांधकाम कार्यक्रम राबविण्याचा निर्णय संदर्भीय शासन निर्णय व परिपत्रकान्वये घेण्यात आलेला आहे. घर तेथे शौचालय या तत्वावर पुढील ३ वर्षामध्ये राज्य निर्मल महाराष्ट्र म्हणून घोषित करण्याचा राज्य शासनाचा संकल्प पूर्ण होण्यासाठी सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी यशस्वीपणे व अधिक गतीमानतेने होणे आवश्यक आहे. या कार्यक्रमांतर्गत राज्य शासनाकडे सुमारे १३ नागरी संस्थांकडून आतापर्यंत प्राप्त झालेल्या प्रकल्प प्रस्तावांची हुडको कार्यालयाच्या अधिकाऱ्यांमार्फत छाननी केल्यानंतर सदर प्रस्तावांमध्ये निदर्शनास आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने, या योजनेअंतर्गत नागंरी संस्थांनी विहीत कार्यपध्दती अवलंबून शासनाकडे प्रकल्प प्रस्ताव सादर करण्याकरिता खालीलप्रमाणे अतिरिक्त निर्देश देण्यात येत आहेत :-

(१) केंद्र पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत यापूर्वी राज्याच्या नागरी भागामध्ये वैयक्तिक व सार्वजनिक शौचालये बांधकाम कार्यक्रम राबविण्याकरिता राज्यातील संबंधित नागरी संस्थांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या केंद्र शासनाच्या अनुदानापैकी संबंधित संस्थांनी सदर कार्यक्रमाकरिता खर्च केलेल्या अनुदानाची उपयोगिता प्रमाणपत्रे समन्वय यंत्रणेमार्फत (म.जी.प्रा.) प्रमाणित करुन घेऊन ती तात्काळ हुडको कार्यालयास सादर करावीत.

(२) तसेच, उक्त केंद्र शासनाच्या अनुदानापैकी संबंधित नागरी संस्थांना वितरित करण्यात आलेली परंतु, अखर्चित राहिलेली तसेच, म.जी.प्रा.कडे अद्यापपर्यंत असलेली अवितरित केंद्र शासनाच्या अनुदानाची रक्कम केंद्र शासनाच्या संबंधित लेखाशिर्षाखाली त्वरित जमा करण्यात यावी. जोपर्यंत यापूर्वीच्या कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाकडून संबंधित नागरी संस्थांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अनुदानापैकी खर्च केलेल्या अनुदानाची उपयोगिता प्रमाणपत्रे व अखर्चित रक्कम संबंधित लेखाशिर्षाखाली जमा करुन तसा अहवाल हुडको कार्यालय, मुंबई यांचेकडे पाठविल्यानंतरच केंद्र शासन पुरस्कृत सुधारित ILCS अंतर्गत राज्य शासनाकडून सादर करण्यात आलेल्या प्रकल्प प्रस्तावांना केंद्र शासनामार्फत मंजूरी प्राप्त होऊन अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.

(३) नवीन योजनेअंतर्गत शासनाकडे प्रकल्प प्रस्ताव सादर करताना नागरी संस्थांनी त्यासोबत अशासकीय संस्थेबरोबर आर्थिक दुर्बल घटकांमधील कुटुंबांचे सर्वेक्षण करण्याकरिता केलेल्या करारनाम्याची प्रत जोडण्यात यावी.

(४) प्रकल्प प्रस्ताव शासनाकडे सादर करताना त्यामध्ये शौचालय बांधकामासाठी लावण्यात आलेले दर हे जिल्हा अनुसूचित दरसूची (District Schedule Rates) प्रमाणेच असावेत आणि ते समन्वय यंत्रणेच्या स्थानिक प्रादेशिक कार्यालयामार्फत प्रमाणित करण्यात यावेत.

(५) सदर कार्यक्रमांतर्गत स्थानिक भौगोलीक परिस्थितीनुसार अपवादात्मक परिस्थितीत द्विशोष / शोष खड्डयांची शौचालये बांधणे शक्य नसल्यामुळे सेप्टीक टँकची शौचकूपे बांधावयाची असल्यास, ती शोषखड्डयासह बांधण्यास अनुमती देण्यात येत आहे. तथापि, याबाबत समन्वय यंत्रणेच्या स्थानिक प्रादेशिक कार्यालयाच्या अभियंत्यांनी नागरी संस्थेमधील संबंधित कार्यक्षेत्रास प्रत्यक्ष भेट देऊन तसे प्रमाणित करणे आवश्यक असून सदरहू प्रमाणपत्र प्रकल्प प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

(६) प्रकल्प प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यापूर्वी नागरी संस्थांनी उक्त प्रमाणपत्रे मिळण्यासाठी समन्वय यंत्रणेच्या स्थानिक प्रादेशिक कार्यालयाकडे अर्ज केल्यानंतर अर्ज केल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या कालावधीत सदर प्रमाणपत्रे नागरी संस्थांना विनामुल्य देणे बंधनकारक आहे.

(७) स्थानिक भौगोलीक परिस्थितीनुसार अपवादात्मक परिस्थितीत सेप्टीक टँकची शौचकूपे बांधताना शौचालयातून निर्माण होणा-या निचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याबाबत यथायोग्य दक्षता संबंधित नागरी संस्थांनी घ्यावी.

(८) या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयास समन्वय यंत्रणा म्हणून घोषित करण्यात आलेले असल्यामुळे सदर कार्यालयामार्फत नागरी संस्थांच्या स्थानिक भौगोलीक परिस्थितीनुसार बांधावयाच्या शौचकूपांचे आरेखन व नकाशे तयार करुन लाभार्थ्यांच्या मार्गदर्शनाकरिता शौचकूपाची एक प्रतिकृती तयार करण्यात येईल व ती राज्यातील सर्व नागरी संस्थांना पाठविण्यात येईल. त्यानुसार बांधकाम करण्यात यावे.

(९) राज्य समन्वय समितीपुढे प्रकल्प प्रस्ताव सादर करण्यापूर्वी समन्वय यंत्रणा (Nodel Agency) यांनी संकलित प्रस्ताव केंद्र शासनाच्या विहीत निकषानुसार यथायोग्य असल्याचे प्रस्तावित करावे.

(९) नागरी संस्थांना केंद्र शासनाच्या अनुदानाची रक्कम केंद्र शासनाकडून २ टप्प्यांमध्ये उपलब्ध करुन देण्यात येणार असून त्यापैकी २५% अनुदान संबंधित नागरी संस्थाच्या प्रकल्प प्रस्तावांना केंद्र शासनाकडून मंजुरी देण्यात आल्यानंतर तात्काळ उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच, केंद्र शासनाकडून सदरहू पहिला हप्ता मुक्त करण्यात आल्यानंतर संबंधित नागरी संस्थांना राज्य हिश्याचे ५०% अनुदान त्वरित उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तद्नंतर, संबंधित नागरी संस्थांची अनुदान उपयोगितेची क्षमता आणि मागणी या बाबी विचारात घेऊन केंद्र शासनाच्या अनुदानाचा व राज्य शासनाच्या अनुदानाचा उर्वरित हिस्सा मुक्त करण्यात येणार असल्यामुळे संबंधित नागरी संस्थांना कोणत्याही परिस्थितीत प्रकल्प मुल्यामध्ये होणारी वाढ अनुज्ञेय नाही. तसेच, केंद्र शासनाच्या अनुदानाचा पहिला हप्ता संबंधित नागरी संस्थेस मुक्त करण्यात आल्यापासून पुढील ६ महिन्यांच्या कालावधीत शौचकूपाचे बांधकाम पूर्ण करणे संबंधित नागरी संस्थेवर बंधनकारक करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या अनुदानाचा प्रत्येक पुढील टप्पा हा शौचालयांच्या बांधकामाच्या प्रगतीवरच अवलंबून राहील.

(१०) नागरी संस्थांनी शासनाकडे प्रकल्प प्रस्ताव सादर करुन त्यास राज्य समन्वय समितीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर ते हुडको कार्यालयाकडे पाठविताना त्याबरोबर राज्य समन्वय समितीचे सदस्य सचिव यांनी सदर प्रकल्प प्रस्ताव परिपूर्ण असल्याबाबतचे शिफारस असलेले प्रमाणपत्र सादर करावे.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्यचा संगणक संकेतांक २००९०५०६०३०९१८००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( जयलक्ष्मी चेक्कला )**
**सह सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. महापौर, महानगरपालिका (सर्व)
२. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
३. विभागीय आयुक्त (सर्व)
४. जिल्हाधिकारी (सर्व)
५. महालेखापाल,महाराष्ट्र-१,मुंबई [लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा]
६. महालेखापाल,महाराष्ट्र -२,नागपूर [लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा]
७. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई
८. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई
९. वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
१०. कार्यकारी संचालक, हूडको विभागीय कार्यालय,मुंबई
११. अधीक्षक अभियांता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सी.पी.डी.एम., ठाणे
१२. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक मुख्य कार्यालय (सर्व)
१३. नगराध्यक्ष, नगर परिषदा (सर्व)
१४. मुख्याधिकारी, नगर परिषदा (सर्व)
१५. सर्व वैधानिक विकास मंडळे
१६.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने
१७. सारसंग्रह
१८.निवड नस्ती-पापु-२१